# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई.

२०२३

## प्रेस नोट

**गुन्हे शाखा, कक्ष २, पनवेल, नवी मुंबई** **दिनांक १७/०१/२०२३**

## देल्हूपुर पोलीस ठाणे, उत्तरप्रदेश येथील खुनाच्या गुन्हयातील फरार असलेल्या ०४ आरोपींना खारघर येथुन गुन्हे शाखा कक्ष २ कडुन अटक

देल्हूपुर पोलीस ठाणे, जिल्हा प्रतापगढ, राज्य उत्तरप्रदेश श्री.वकिल अहमद उर्फ पप्पु, वय ४५ वर्षे, रा. तौकलपुर, पो.भिखनापुर, ता. राणीगंज, देल्हूपुर, जि. प्रतापगढ, राज्य उत्तरप्रदेश यांनी दिलेल्या फिर्यादी वरून गु.र.नं. ९३/२०२२ भा.द.वि. ३०२, १४७, १४८, १४९, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

नमुद गुन्हयातील फिर्यादी व आरोपी यांच्यात पुर्वी पासून वाद होते. दिनांक १४/१२/२०२२ रोजी १८:१५ वाजताचे सुमारास फिर्यादी यांचा भाउ रकिब व भाचा असफाक मोटर सायकल वरून देल्हूपुर बाजारातून घरी जात असताना आरोपी यांनी गैरकायद्याची मंडळी जमवून हातात लाठयाकाठया, लोखंडी सळई घेवून फिर्यादी यांचा भाउ व भाचा यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने आरोपी यांनी त्यांचे ताब्यातील ब्रिजा कार ने रकिब व असफाक यांचे मोटर सायकलला ठोकर मारून त्यांना खाली पाडुन हातातील लाठयाकाठया व लोखंडी सळईने त्यांना मारहाण केली. तसेच आरोपींनी त्यांचे हातातील अग्निशस्त्राने जखमींवर फायर करून त्यांना गंभीर स्वरूपाच्या दुखापती केल्या व शिविगाळी करून जिवे ठार मारण्याची धमकी देवून तेथुन पळुन गेले. सदर गुन्हयातील जखमी रकिब हा दवाउपचारा दरम्यान दिनांक १६/०१/२०२३ रोजी मयत झाला.

खुना सारख्या गंभीर गुन्हयातील आरोपी हे गुन्हा घडल्यानंतर फरार झाल्याने व त्यातील चार आरोपी हे नवी मुंबई परीसरात वास्तव्यास असल्याबाबत माहिती मिळाल्याने सदर आरोपींचा शोध घेवून गुन्हा उघडकीस आणण्याबाबत मा.पोलीस आयुक्त, श्री.मिलींद भारांबे, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.महेश घुर्ये, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे), विजय काळे यांनी आदेशीत केले होते. त्याप्रमाणे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या वेगवेगळया टिम तयार करून आरोपींचा सर्वोतोपरी शोध सुरू करण्यात आला.

गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मागील काही दिवसांपासून वर नमुद गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असताना गुन्हयातील ०४ आरोपी हे खारघर, नवी मुंबई परिसरात असल्याबाबत गोपनिय बातमीदाराकडुन खात्रीलायक प्राप्त केली. सदर गुन्हयाचा तांत्रिक तपास करून मिळालेल्या माहिती प्रमाणे सेक्टर ८, खारघर येथे जावून सापळा लावून सदरचे आरोपी हे खारघर येथुन पळुन जाण्याचे तयारीत असताना त्यांना शिताफिने ताब्यात घेण्यात आले.

**गुन्हयातील आरोपींची नावे –**

**१) इम्रान असीर खान, वय ३० वर्षे, व्य. नोकरी,**

**२) मोहम्मद सलमान असीर खान, वय २९ वर्षे, व्य. ड्रायव्हर,**

**३) गुफारान असीर खान, वय २० वर्षे, व्य. ड्रायव्हर,**

**४) मोहम्मद मुजीद इब्रार अली, वय २२ वर्षे, व्य. ड्रायव्हर,**

**आरोपी क्रमांक ०१ ते ०४ राहणार – तौकलपुर, पो. भिखनापुर, ता. राणीगंज, जि. प्रतापगढ, राज्य उत्तर प्रदेश**

मा.वरिष्ठांचे आदेशाने वर नमुद आरोपींना गुन्हयाचे पुढिल तपासकामी देल्हूपुर पोलीस ठाणे, उत्तरप्रदेश येथील पोलीस उप निरीक्षक, राकेश चौरसीया व पोलीस पथकाचे ताब्यात देण्यात आले आहेत.

सदरची उत्कृष्ट कारवाई नवी मुंबई गुन्हे शाखा कक्ष २, पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र पाटील, सपोनि. प्रविण फडतरे, सपोनि. संदिप गायकवाड, पोउपनि. मानसिंग पाटील, पोउपनि.वैभवकुमार रोंगे, पोहवा/१०३४ ज्ञानेश्वर वाघ, पोहवा/१३४३ मधुकर गडगे, पोहवा/४२० सचिन पवार, पोहवा/१७३२ अनिल पाटील, पोहवा/१३३९ प्रशांत काटकर, पोहवा/९०२ रमेश शिंदे, पोहवा/१९३ रणजित पाटील, चापोहवा/४४०८ अजित पाटील, पोहवा/२१५५० तांडेल, पोहवा/१७९९ निलेश पाटील, पोहवा/२०२२ रूपेश पाटील, पोहवा/२०८२ इंद्रजित कानु, पोहवा/१७३८ दिपक डोंगरे, पोहवा/१८१७ सागर रसाळ, पोहवा/२२५६ राहुल पवार, पोना/४४१३ आजिनाथ फुंदे, पोना/२३३४ प्रफुल्ल मोरे, पोशि/१२५९३ संजय पाटील, पोशि/३५७७ प्रविण भोपी, पोशि/४३१७ विक्रांत माळ, पोशि/३६२५ अभय मे—या, पोशि/३५४१ नंदकुमार ढगे यांनी केली आहे.